RNI No. MAHBIL /2009/31747
Reg. No. MCS/166/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–ल

वर्ष ३, अंक ४७(२)] शुक्रवार, ऑगस्ट १८, २०१७/श्रावण २७, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ८०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट २०१७

**अधिसूचना**

**इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६.**

क्रमांक इमारत. २०१५/प्र.क्र. २६४/कामगार-७.—इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ (१९९६ चा २७) याच्या कलम २ च्या खंड (घ) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, समुचित शासन या नात्याने महाराष्ट्र शासन, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, उक्त अधिनियमाच्या खंड (घ) च्या अर्थांतर्गत इमारत किंवा इतर बांधकाम करावयाची पुढील कामे याद्वारे विनिर्दिष्ट करीत आहे :—

(१) दगड कापणे, फोडणे व दगडाचा बारीक चुरा करणे.

(२) लादी किंवा टाईल्स कापणे व पॉलिश करणे.

(३) रंग, वॉर्निश लावणे, इत्यादीसह सुतारकाम.

(४) गटार व नळजोडणीची कामे.

(५) वायरिंग, वितरण, तावदान बसविणे इत्यादीसहित विद्युत कामे.

(६) अग्निशमन यंत्रणा बसविणे व तिची दुरुस्ती करणे.

(७) वातानुकूलित यंत्रणा बसविणे व तिची दुरुस्ती करणे.

(८) उद्वाहने, स्वयंचलित जिने इत्यादी बसविणे.

(९) सुरक्षा दरवाजे उपकरणे इत्यादी बसविणे.

(१०) लोखंडाच्या किंवा धातुच्या ग्रिल्स, खिडक्या, दरवाजे तयार करणे व बसविणे.

(११) जलसंचयन संरचनेचे बांधकाम करणे.

(१२) सुतारकाम करणे, आभाशी छत, प्रकाश व्यवस्था, प्लास्टर ऑफ पेरीस यांसहित अंतर्गत (सजावटीचे) काम.

(१३) काच कापणे, काचरोगण लावणे व काचेची तावदाने बसविणे.

(१४) कारखाना अधिनियम, १९४८ खाली समावेश नसलेल्या विटा, छप्परांवरील कौल इत्यादी तयार करणे.

(१५) सौर तावदाने इत्यादींसारखी ऊर्जाक्षम उपकरण बसविणे.

(१६) स्वयंपाकखोली सारख्या ठिकाणी वापरण्यासाठी मोडुलर (आधुनिक) युनिट बसविणे.

(१७) सिमेन्ट काँक्रिटच्या साचेबद्ध वस्तू इत्यादी तयार करणे व बसविणे.

(१८) जलतरण तलाव, गोल्फचे मैदान इत्यादीसह खेळ किंवा मनोरंजनाच्या सुविधांचे बांधकाम करणे.

(१९) माहिती फलक, रोड फर्निचर, प्रवाशी निवारे किंवा बसस्थानके, सिग्नल यंत्रणा इत्यादी बांधणे किंवा उभारणे.

(२०) रोटरीजचे बांधकाम करणे, कारंजे बसविणे इत्यादी.

(२१) सार्वजनिक उद्याने, पदपथ, रमणीय भू-प्रदेश इत्यादींचे बांधकाम.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. पुं. विधळे,**

शासनाचे सहसचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 18th August 2017

*NOTIFICATION*

BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (EMPLOYMENT AND REGULATION CONDITION OF SERVICE) ACT, 1996.

No. EMARAT.2015/C.R.264/LABOUR-7.—In the exercise of the powers conferred by clause (*d*) of section 2 of Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Condition of Service) Act, 1996 (27 of 1996), the Government of Maharashtra being an appropriated Government, hereby specifies the following works to be the building or other construction work within the meaning of clause (*d*) of section 2 of the said Act, for the purposes of the said Act, namely :—

(1) Cutting, breaking and crushing of stone.

(2) Cutting and polishing of slabs/tiles.

(3) Woodwork including painting, varnishing etc.

(4) Sewerage and plumbing work.

(5) Electrical Works including writing, distribution, panel fixing etc.

(6) Installation and repair of firefighting systems.

(7) Installation and repairing of cooling and heating system.

(8) Installation of lifts, escalators etc.

(9) Installation of security gates, devices etc.

(10) Fabrication and installation of iron or metal grills, window, doors.

(11) Construction of water harvesting structure.

(12) Interior work including carpentering, false ceiling, lighting, plaster of paris.

(13) Cutting, glazing and installation of glass panels.

(14) Making of bricks, roofing tiles, etc. not covered under the Factories Act, 1948.

(15) Installation of energy efficient equipment like solar panels etc.

(16) Installation of modular units for use in places such as kitchen.

(17) Making and Installation of pre-fabricated concrete modules etc.

(18) Construction of sports or reaction facilities including swimming pools, golf courses, etc.

(19) Construction or erection of signage, road furniture, bus shelters or depots of stands, signaling system etc.

(20) Construction of rotaries, installation of fountains etc.

(21) Construction of public parks, walking tracks, landscaping etc.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. P. VIDHALE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.